जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/२३५२८/२०२३

वाहतुक नियंत्रण अधिसुचना दिनांक -२७ / ०६/२०२३

वाकड वाहतुक विभागाचे हद्दीमध्ये कावेरीनगर अंडरपास जवळून पवार नगरमध्ये जाण्या-येण्या साठी अरुंद रस्ता आहे तसेच त्या रस्त्याने आतमधील ३-४ गल्लीमध्ये जाण्यासाठी त्याच रस्त्याचा नागरीक वापर करतात. पवारनगर गल्ली क्र १ च्या सुरवातीस वाहने पार्क झाल्यामुळे सदर ठिकाणी वाहतुक कोंडी निर्माण होते.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी काकासाहेब डोळे, पोलीस उप-आयूक्त वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

## वाकड वाहतुक विभाग अंतर्गत

| अ.क्र. | ठिकाण | निर्बंध |
|---|---|---|
| १. | पवार नगर गल्ली नं १ सुरुवातीस रस्त्याच्या दोन्ही बाजुस काका वडेवाले व यशराज हेअर सलुन समोर ५० मिटर पर्यंत | नो पार्किंग |

तरी वरील ठिकाणी नोपार्किंग झोन करणेबाबत आदेश (नोटीफिकेशन) करण्यात येत आहे.

सदरची अधिसुचना अमंलबजावणी२८/०६/२०२३ पासुन करण्यात येत आहे.

(काकासाहेब डोळे)
पोलीस उप-आयुक्त प्रभारी २
अति. कार्य वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

२/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी वाकड वाहतुक विभाग

२/- सदर ठिकाणी नोपार्किंगचे बोर्ड लावणेबाबत योग्य ती कारवाई करावी.

४) कार्यकारी अधिकारी, ड क्षेत्रिय कार्यालय, पिंपरी चिंचवड

२/- सदर ठिकाणी वरील वाहतुक निर्बधाचे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.

Scanned with CamScanner